Pune Police

प्रेस नोट दि. २५/०८/१७

**''भर दिवसा घडलेल्या दरोड्याच्या गुन्ह्याचा ४८ तासामध्ये दरोडा प्रतिबंधक पथक दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर यांनी छडा लावून व ५ आरोपीना पिस्तुल व मुद्देमालासह अटक''**

दि. २२/०८/२०१७ रोजी फरासखाना पो स्टे हद्दीमध्ये भरदिवसा क्वीक कुरीअर सर्व्हीस या ठिकाणी काही इसमांनी येऊन पिस्तुलचा धाक दाखवून कुरीअर सर्व्हीसचे मालक व नोकर यांना हातापायास बांधून कुरीअर सर्व्हीस मध्ये असणारी रोख रक्कम २,२५,०००/- तेथील सी सी डी व्ही आर मशिन, दुकानातील ३ मोबाईल चोरुन नेऊन जबरीची चोरी केली. सदर बाबत फरासखाना पो स्टे येथे गुन्हा रजि नंबर १८९/२०१७ भा दं वि कलम ३९२, ३४२, ३४ व आर्म अॅक्ट ३ (२५) मुं पो अधि ३७(१), १३५ झाला. सदर गुन्ह्याबाबत मा. रविंद्र सेनगावकर, अपोआ दप्रावि पुणे शहर यांनी तपास करण्याचे आदेश पथकास दिल्याने सदर घटनास्थळावर जाऊन लगतचे परीसरातील सी सी टी व्ही फुटेज प्राप्त करुन तपास करीत असताना दक्षिण प्रादेशिक विभाग, कार्यालया अंतर्गत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या दरोडा प्रतिबंधक पथकातील कृष्णा बढे व योगेश घाटगे यांनी सदरचे फुटेज बातमीदारास दाखवले. त्या प्रमाणे बातमीदाराकडून गोपनीय माहिती प्राप्त झाली की, नमुद गुन्ह्यातील संशयीत आरोपी इसम कस्तुरे चौक गुरुवार पेठ जवळील एका इमारतीमध्ये लपलेले आहेत. त्या प्रमाणे मा. सहा पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे बातमीची खात्री करुन सहा पो निरी प्रकाश मोरे, यांनी पोलीस स्टाफसह बातमीचे ठिकाणी जाऊन छापा टाकला असता संशयीत इसम **१) उत्तमकुमार जसाराम माली, रा ४९ रविवार पेठ कस्तुरी चौक पुणे, २) भैरुलाल हरीशंकर रावल, रा. सदर ३) शंभुसिंग मूलसिंग सिंदल, रा. सदर ४) जितेंद्र असुसिंग राजपूत, रा. सदर ५) जितेंद्र सुमेरसिंग राठोड, रा. सदर** यांचे वर्णन फुटेजमधील वर्णनाशी मिळते जुळते असल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. सदर इसमांकडे दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने सखोल तपास करता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यांचे अंगझडतीमध्ये व राहत्या ठिकाणचे झडती मध्ये १) गावठी पिस्टल व ४ जीवंत काडतुसे, २)सुरा, ३) ६ मोबाईल हँडसेट, ४) ६२,०००/- रु रोख रक्कम, ५) ३ दुचाकी वाहने, ६) वेईंग सिस्टिम ७) लॅपटॉप पार्ट असा एकुण **२,५४, ४५०/-** रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमूद सर्व आरोपी हे मूळचे राजस्थानचे असून आरोपी भैरुलाल हरीशंकर रावल हा हॉटेल महाराणा दरबार कस्तुरे चौक गुरुवार पेठ पुणे येथे मेस चालवत असून त्याचेकडे पुण्यात काम करणारे राजस्थानी इसम हे जेवण्यास येत असतात. तेथेच शंभुसिग मूलसिंग सिंदल, यास क्वीक कुरीअरची माहिती असून तेथे भरपूर रोख रुपये मिळतील असे वरील आरोपींना सांगून त्या प्रमाणे पिस्तुल, सुरा अशी हत्यारे प्राप्त करुन क्वीक कुरीअर सर्व्हीस येथे भर दिवसा धाडसी जबरी चोरी केली. सदरची आरोपी हे पुणे शहरातील वेगवेगळ्या दुकानांमध्ये काम करणारे कामगार असून तात्काळ कमी श्रमामध्ये जास्त पैसे मिळावे म्हणून त्यांनी सदरचा धाडसी दरोडा त्यांचे इतर साथीदारासह टाकला आहे.

श्री. रविंद्र सेनगावकर, अपोआ दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, श्री. बसवराज तेली, पोउआ परीमंडळ १ पुणे, श्री. शिवाजी पवार, सपोआ स्वारगेट विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो. निरीक्षक प्रकाश मोरे, पोउनि चंद्रकांत लोहकरे, पोहवा दिनेश शिंदे, कृष्णा बढे, योगेश घाटगे, बापू खुटवड, रविंद्र फुलपगारे, सचिन ढोक, प्रमोद मोहिते, अवधूत जमदाडे, महावीर वलटे; नितीन जगदाळे, नितेश जाधव, मयुर शिंदे, अय्याज दड्डिकर, अविनाश कोंडे, निलेश जाधव, संजय बनसोडे, वैभव शितकल यांनी पार पाडली आहे.


महाराष्ट्र पोलीस